वर्ष : ०५ | अंक: ४६ | मुंबई, मंगळवार ८ ऑक्टोबर २०१९ ते सोमवार १४ ऑक्टोबर २०१९ | पृष्ठ: ४

मूल्य २/- रुपये

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION
NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब

3 → खुली राजकीय व्यवस्था!

तिकीट कापलेले खडसे-तावडे भाजपचे स्टार प्रचारक ← 4

# आरे वृक्षतोडीला सुप्रीम कोर्टाची तूर्त स्थगिती





**नवी दिल्लीः -आरेतील वृक्षतोडीला सर्वोच्च न्यायालयाने तूर्तास स्थगिती दिली आहे. पर्यावरणप्रेमींना यामुळे दिलासा मिळाला आहे. आंदोलन करणाऱ्या ज्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे, त्यांची सुटका करण्याचे आदेशही सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारला दिले. २१ ऑक्टोबरला पुढील सुनावणी होणार आहे. न्यायालयाने महाधिवक्त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आणि त्यांनतर पुढील सुनावणीपर्यंत जैसै ते स्थिती ठेवण्याचे आदेश दिले. आतापर्यंत किती झाडे तोडली त्याचा तपशीलही देण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. झाडे तोडण्याची कार्यवाही थांबवून यथा स्थिती ठेवावी आणि जी पर्यायी झाडे लावली आहेत त्यांच्या जगण्यावरही लक्ष ठेवावे, असेही निर्देश खंडपीठाने दिले.**

दिल्ली, ग्रेटर नॉएडा येथील लॉ कॉलेजचा विद्यार्थी रिषभ रंजन याने काल सरन्यायाधीश रंजन गोगोई यांना पत्र लिहून मुंबई आरे कॉलनीमधील विदारक परिस्थिती निदर्शनास आणली आणि तातडीने सुनावणी घेऊन झाडे तोडण्यावर स्थगिती आणण्याची विनंती केली. त्याचबरोबर युवा आरे आंदोलकांना मुंबई पोलिसांकडून मिळालेल्या वर्तणुकीकडेही लक्ष वेधले. त्याची दखल सरन्यायाधीशांनी घेतली आणि या प्रकरणी सुमोटो याचिका दाखल करून घेतली. तसेच सध्या सुप्रीम कोर्टाला दसरा सणानिमित्त आठवड्याभराची सुटी असल्याने सरन्यायाधीशांनी न्यायमूर्ती अरुण मिश्रा व न्यायमूर्ती अशोक भूषण यांचे विशेष खंडपीठ स्थापन केले.

त्यांनतर सोमवारी सकाळी या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावेळी सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी बाजू मांडली. कोणीही आंदोलक अद्याप अटकेत असतील

उर्वरित पृष्ठ 2 वर

### अटक केलेल्या २५ आंदोलकांची सुटका

आरेमधील वृक्षतोडीच्या निषेधार्थ आंदोलन केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या २५ आंदोलकांची सुटका करण्यात आली आहे. सुटका करण्यात आलेल्यांमध्ये आदिवासी महिलांचाही समावेश आहे. या सर्व आंदोलकांची ठाणे मध्यवर्ती कारागृहातून सुटका करण्यात आली असून सुटकेनंतर कारागृहाबाहेर जमलेल्या पर्यावरणप्रेमींनी एकच जल्लोष केला.




## महाराष्ट्र हादरला!

### भाजप नेत्यासह कुटुंबावर गोळीबार





**भुसावळ** - भुसावळमध्ये अंदाधुंद गोळीबार झाला असून यामध्ये ५ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती देण्यात आली आहे. भाजपचे नगरसेवक रवींद्र खरात उर्फ हंप्या यांच्या कुटुंबावर अज्ञात हल्लेखोरांनी अंधाधुंद गोळीबार केला आहे. यात ५ जणांचा मृत्यू झाला आहे. या संपूर्ण प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी ३ संशयित आरोपींना ताब्यात घेतलं असून पुढील तपास सुरू आहे.

रविवारी रात्री उशिरा ही घटना घडली आहे. जेव्हा नगरसेवक रवींद्र हे त्यांच्या कुटुंबासोबत घरी होते. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हल्लेखोर रविंद्रच्या घरी देशी पिस्तूल, चाकू घेऊन घुसले आणि गोळ्या झाडल्या. हल्ला करुन हल्लेखोर तिथून पळून गेले पण नंतर त्यांनी आत्मसमर्पण केलं.

हल्ल्यात वापरलेली शस्त्रे घटनास्थळावरून पोलिसांनी जप्त केली असल्याचं सांगण्यात येत आहे. दरम्यान, या गोळीबारात जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले पण उपचारादरम्यान सर्वांचा मृत्यू झाला. या घटनेमागील खरं कारण अद्याप समजू शकलेलं नाही.

## भाजपची अडचण समजून घेऊन युती केली



*मुंबई: 'युती करताना १२४ जागा घेऊन मी कुठलीही तडजोड केलेली नाही. एकाकी लढायचं असेल तर शिवसेना कधीही लढू शकते. पण मी भाजपची अडचण समजून घेतलीय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी तशी विनंती केली होती. मी त्यांना समजून घेतले,' अशा शब्दांत शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी युतीतील जागावाटपाचं विश्लेषण केलं आहे.*

'सामना ऑनलाइन'ला दिलेल्या मुलाखतीत उद्धव बोलत होते. विधानसभा निवडणुकीत युती करताना कमी जागा घेऊन शिवसेनेला छोट्या भावाची भूमिका घ्यावी लागली आहे. त्यावरून राजकीय चर्चेला ऊत आला आहे. त्याच अनुषंगानं संजय राऊत यांनी उद्धव यांना प्रश्न विचारला होता. त्यावर बोलताना, 'महाराष्ट्राच्या हितासाठी मी युती केलीय. भाजपला समजून घेतलेय. महाराष्ट्राला हे माहीत आहे. महाराष्ट्र हा काही धृतराष्ट्र नाही,' असं उद्धव म्हणाले.

युतीमध्ये शिवसेनेच्या वाट्याला कमी जागा आल्या आहेत असं आता दिसत असलं तरी हे चित्र तात्कालिक आहे. जागांचा आकडा लहान असला तरी आमदारांचा आकडा मोठा असेल. शिवसेनेच्या इतिहासातील सर्वाधिक आमदार यावेळी निवडून येतील. शिवसेनेचे जास्तीत जास्त आमदार निवडून येण्याची ही पहिलीच वेळ असेल,' असा विश्वास उद्धव यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात व्यक्त केला. लोकसभेला ठरलेला ५०:५० चा करार मोडला असं वाटतं का असं विचारलं असता उद्धव म्हणाले, 'अधिकार व जबाबदाऱ्यांचं समसमान वाटप हा मुद्दा युतीमध्ये महत्त्वाचा आहे. येत्या २४ तारखेला युतीचं सरकार सत्तेवर येईल तेव्हा समसमान वाटप काय असतं हे लोकांना कळेल.'

### राम मंदिर उभारावंच लागेल!

'राम मंदिर हे उभारावंच लागेल. त्यामागे कोणाला काय राजकारण करायचं आहे ते करो. पण आम्ही तो विषय सोडणार नाही. त्यामुळंच आम्ही अयोध्येत गेलो होतो. पंतप्रधानांनी आम्हाला थोडं थांबायला सांगितलं आहे. थोडं थांबतो,' असं उद्धव म्हणाले.

### आदित्यला लादणार नाही!

'शिवसेनेसाठी आदित्य माझ्यापेक्षा अधिक मेहनत घेतोय. बाळासाहेबांकडूनच त्यालाही हे 'बाळकडू' मिळालेत. 'जन आशीर्वाद' यात्रेतून त्यानं शंभर-सव्वाशे मतदारसंघ पालथे घातलेत. अशा तरुणांना संधी मिळायला हवी. माझा मुलगा म्हणून मी त्याला शिवसैनिकांवर लादणार नाही,' असं उद्धव म्हणाले.

## मुंबईत निवडणूकीदरम्यान ४ दिवसांसाठी दारुविक्री बंद



राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली असून २१ ऑक्टोबरला मतदान होणार आहे तर २४ ऑक्टोबरला निकाल जाहीर होणार आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत चार दिवसांसाठी सर्व प्रकारची दारुविक्री बंद राहणार आहे. मुंबई शहरचे जिल्हाधिकारी शिवाजीराव जोंधळे यांनी याबाबत आदेश दिले आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार, राज्यात होत असलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर १९ ऑक्टोबर ते २१ ऑक्टोबरपर्यंत सलग तीन दिवस तसेच २४ ऑक्टोबर रोजी एक दिवस अशा एकूण चार दिवसांसाठी मुंबई शहरात सर्व प्रकारच्या दारुविक्रीवर बंदी असेल त्यामुळे सर्व दारुची दुकाने बंद ठेवण्यात येतील. दरम्यान, निवडणूक आयोगास आवश्यक असलेली माहिती सादर न करणे, तसेच मद्याची घरपोच सेवा पुरविणाऱ्या सहा जणांवरही कारवाई झाली आहे. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी या सहा परवान्यांचे निलंबन केले आहे. मे. साईनाथ देशी बार, बॉम्बे देशी बार, मे. दरयुश, मे. हरिटेज, मे. मयूर परमिट रूम व फन ॲण्ड फेअर या वाइनशॉपचा समावेश आहे.

## दुधाच्या नावाखाली मुंबईकरांना पाजत होते विष; तिघांना अटक

**दुधाच्या नावाखाली विष पाजून मुंबईकरांच्या जिवाशी खेळणाऱ्या टोळीच्या 'युनिट १०'ने मुसक्या आवळल्या. मसी सादिक खोत, नजीब खोटाल, अनिस खांदे अशी या तिघांची नावे आहेत. या तिघांनाही गुरुवारी न्यायालयात हजर केले जाणार आहे.**



मुंबईत काही ठिकाणी तबेले आहेत. गाई-म्हशींना जास्त दूध यावे याकरिता काही तबेले मालक हे ऑक्सिटोसीनचा वापर करत असल्याची माहिती युनिट १० चे सचिन ठोंबरे यांना मिळाली. त्या माहितीची पोलिसांनी सत्यता पडताळली. आरोपीच्या अटकेकरिता पोलिसांनी शोधमोहीम हाती घेतली. पोलीस उपायुक्त अकबर पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट १० चे पोलीस निरीक्षक सुनील माने यांच्या पथकाने तपास सुरू केला.

ऑक्सिटोसीनच्या विक्रीसाठी काहीजण गोरेगाव परिसरात येणार असल्याची खबर पोलिसांना मिळाली. पोलिसांनी आरे परिसरात सापळा रचून नजीब आणि अनिसला ताब्यात घेतले. या दोघांकडून ऑक्सिटोसीनच्या एक हजार बाटल्या पोलिसांनी जप्त केल्या.

## कर्जात बुडालाय महाराष्ट्र माझा

### ५ वर्षांत ३.५ लाख कोटींची वाढ



**मुंबईः राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगूल वाजले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अभूतपूर्व यशाचे स्वप्न पाहत निवडणूक प्रचारासाठी दिवसरात्र एक करत आहेत. दरम्यानच्या काळात फडणवीस सरकार राज्याच्या विकासाचा आलेख उचावत असल्याचा दावा सतत करत असले, तरी देखील दुसरीकडे राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत असल्याचे वास्तव समोर येत आहे. सन २०१४ मध्ये जेव्हा फडणवीस सरकार सत्तेत आले, त्यावेळी राज्यावर एकूण १.८ लाख कोटी रुपयांचे कर्ज होते. मात्र, जून २०१९ पर्यंत हा कर्जाचा डोंगर वाढत जात तो ४.७१ लाख कोटी रुपये इतका झाला आहे. या व्यतिरिक्त फडणवीस सरकारने सुमारे ४३ हजार कोटी रुपयांच्या योजनांसाठी बँकेची हमी दिलेली आहे.**

तथापि, गेल्या पाच वर्षांच्या काळात राज्याचे सकल घरेलू उत्पादनातही वाढ झाली आहे. माजी वित्त सचिव सुबोध कुमार यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, जेव्हा आपण राज्याच्या एकूण कर्जाबाबत बोलत असतो तेव्हा राज्यातील योजनांना देण्यात आलेल्या हमी देखील गांभिर्याने घेण्याचा आवश्यकता आहे. ज्या संस्थांनी घेतलेले कर्ज चुकवले नाही, तर राज्य सरकारला यासाठी पुढे येणे गरजेचे असते.

वर्ष २०१६-१७ मध्ये राज्य सरकारने ७३०५ कोटी रुपयांच्या कर्जासाठी हमी दिली होती. वर्ष २०१७-१८ मध्ये या हमीत वाढ होत ती २६६५७ रुपयांपर्यंत पोहोचली होती. हे प्रामुख्याने एमएमआरडीएने मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पासाठी, त्याच बरोबर मेट्रो-४ प्रकल्पासाठी १९०१६ कोटी रुपयांच्या कर्जाला हमी दिल्यामुले झाले आहे. या व्यतिरिक्त राज्य सरकारने या वर्षी ऑगस्ट महिन्यात नागपूर एक्स्प्रेस वेसाठी घेतलेल्या ४ हजार कोटी रुपयांच्या कर्जाला हमी दिलेली आहे.



# काँग्रेसवरील विघ्न काही सुटेना; मुंबईच्या माजी अध्यक्षांकडून भाजपाचा प्रचार

गेल्या काही महिन्यापासून काँग्रेस पक्षाला लागलेले विघ्न सुटण्याचं नावंच घेत नाहीये. आता पुन्हा एकदा काँग्रेसच्या अडचणीत वाढ झाली आहे. एकीकडे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते संजय निरूपम यांनी अंतर्गत गटबाजीला कंटाळून विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा प्रचार न करण्याचा निर्णय घेतला. त्यातच आता पक्षाचा राजीनामा दिलेले आणि मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष कृपाशंकर सिंह यांनी भाजपाच्या उमेदवाराचा प्रचार करण्याचा निर्णय घेतला आहे. कृपाशंकर सिंह हे अपक्ष किंवा कोणत्याही पक्षाकडून निवडणूक लढवत नसले तरी त्यांनी भाजपाच्या उमेदवाराच्या प्रचारात सहभागी होण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात आता चर्चांना उधाण आलं आहे. तसंच त्यांचा जनसंपर्कही उत्तम असल्यामुळे काँग्रेसच्या अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



मिरा-भाईंदरचे भाजपाचे विद्यमान आमदार नरेंद्र मेहता यांचा प्रचार करण्याचा निर्णय कृपाशंकर सिंह यांनी घेतला आहे. कृपाशंकर सिंह यांनी पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांनी अद्याप कोणत्याही पक्षात प्रवेश केला नाहीये. दसऱ्यानिमित्त आयोजित एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात नरेंद्र मेहताही आले असल्याचं स्पष्टीकरण यानंतर त्यांच्याकडून देण्यात आलं.

काही दिवसांपूर्वीच कृपा शंकर सिंह यांनी काँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. काँग्रेसच्या हंगामी अध्यक्षा सोनिया गांधी यांच्याकडे त्यांनी आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा सोपवला होता. परंतु त्यानंतर त्यांनी कोणत्याही अन्य पक्षात प्रवेश केला नव्हता. आता नरेंद्र मेहतांच्या प्रचारात ते सहभागी होणार असल्याने ते भाजपामध्ये प्रवेश करतील अशा शक्यता वर्तवण्यात येत आहेत. यापूर्वी उर्मिला मातोंडकर यांनीदेखील पक्षांतर्गत गटबाजीला कंटाळून आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता.

# आमदार व्हायचंय! आजी-माजी ११ नगरसेवक रिंगणात

**मुंबईः** मुंबई महापालिकेतून थेट राज्याच्या विधानसभेत आमदार म्हणून निवडून जाण्याची याआधीची परंपरा यावेळीदेखील नगरसेवकांनी कायम ठेवली आहे. मुंबईचे महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांच्यासह जवळपास डझनभर विद्यमान नगरसेवक, तर अनेक माजी नगरसेवकही आमदार बनण्यासाठी निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

आगामी विधानसभा निवडणुकीत मुंबईतल्या ३६ विधानसभा मतदारसंघांतून अनेक आजी-माजी आमदार रिंगणात आहेतच, पण नगरसेवकही त्यांच्यासोबत विविध राजकीय पक्षांचे ११ विद्यमान नगरसेवक मैदानात उतरले आहेत. यातले नऊ



जण अधिकृत उमेदवार आहेत, तर काहींनी अपक्ष म्हणून तर काहींनी बंडखोरी केली आहे. शिवसेनेने महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांना वांद्रे पूर्व मतदारसंघातून, नगरसेवक रमेश कोरगावकर यांना भांडुपमधून, तर नगरसेवक दिलीप लांडे यांना चांदिवलीमधून उमेदवारी दिली आहे. काँग्रेस नगरसेवक आसिफ झकेरिया यांना वांद्रे पश्चिममधून तर जगदीश अमीन कुट्टी अंधेरी पूर्व मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. मुंबई महापालिकेतले सर्वांत श्रीमंत नगरसेवक पराग शाह यांना भाजपने घाटकोपर पूर्वमधून उमेदवारी दिली आहे, तर समाजवादी पक्षाचे नगरसेवक रईस शेख भिवंडीतून निवडणूक लढवत आहेत. मनसेचे संजय तुर्डे यांनी कालिना मतदारसंघातून उमेदवारी दाखल केली आहे, तर अखिल भारतीय सेनेच्या गीता गवळीही भायखळ्यामधून लढत आहेत. या नऊ अधिकृत उमेदवारांखेरीज शिवसेनेच्या नगरसेविका राजूल पटेल यांनी वर्सोवामधून बंडखोरी केली आहे, तर काँग्रेस नगरसेवक सुफियान वणू मानखूर्द शिवाजीनगर येथून अपक्ष लढत आहेत.

# प्लास्टिकमुक्तीसाठी नवी मुंबईत 'झोला ब्रिगेड'



**नवी मुंबई-** शहरातून प्लास्टिक हद्दपार करण्यासाठी नवी मुंबईतील काही पर्यावरणप्रेमी पुढे सरसावले आहेत. शहरात प्लास्टिक पिशव्यांचा किरकोळ विक्रेत्यांकडून अधिक वापर केला जात असल्याने, या पर्यावरणप्रेमींनी एकत्र येऊन 'झोला ब्रिगेड' स्थापन केली आहे. या ब्रिगेडमार्फत वाशी येथील एपीएमसी मार्केटमधील विक्रेत्यांना कापडी पिशव्या देण्यात आल्या. 'झोला ब्रिगेड'ची संकल्पना शिवानी ओझा, कल्पना छत्रे, रोहित मल्होत्रा, पूनम मिश्रा यांची आहे. वापरलेल्या पण स्वच्छ धुतलेल्या कॉटनच्या जुन्या चादरी, साड्या, ओढण्या लोकांकडून जमा करायच्या आणि त्यापासून कापडी पिशव्या बनवायच्या व त्या विक्रेत्यांना परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून द्यायच्या. जेणेकरून काही स्वयंसेवी गटांनाही रोजगाराचे माध्यम उपलब्ध होईल. याबाबत शिवानी ओझा यांनी सांगितले, की प्लास्टिक तत्काळ हद्दपार होणे अशक्य आहे. शहराला प्लास्टिकमुक्त करण्यासाठी आपण स्वतः पुढाकार घ्यायला हवा. विक्रेत्यांना प्लास्टिकला पर्याय ठरेल, अशा पिशव्या अल्प दरात उपलब्ध करायला हव्यात. गांधी जयंती आणि लाल बहादूर शास्त्री जयंतीनिमित्त त्यांनी नुकतेच अशा ५५० पिशव्या वाशी सेक्टर ९ ए मधील फळ आणि भाजी विक्रेत्यांना दिल्या. या उपक्रमात शहरातील 'विमेन ऑफ विसडम' ग्रुपही सहभागी झाला होता. या वेळी मॉडेल, ॲक्टर कोमल मिरानदेखील या उपक्रमाला पाठिंबा दर्शवण्यासाठी उपस्थित होत्या. या उपक्रमाला विक्रेत्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. कापडी पिशव्यांची मागणीदेखील वाढत आहे.

# भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळेच भाजपने उमेदवारी नाकारली?

**मुंबई-** ज्येष्ठ भाजप नेते एकनाथ खडसे, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रकाश मेहता, विनोद तावडे आदींना भाजपने उमेदवारी नाकारल्याच्या काही कारणांमागे गेल्या काही वर्षांत त्यांच्यावर झालेले भ्रष्टाचाराचे आरोप हे एक महत्त्वाचे कारण असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे जाताना विरोधकांकडून होणाऱ्या आरोपांना तोंड देण्यासाठी पक्षाची प्रतिमा उजळविण्याचा हा प्रयत्न असल्याचे सूत्रांनी सांगितले. मात्र भाजपने उशिरा का होईना, भ्रष्टाचारी नेत्यांवर कारवाई केली आणि जे नेते अजूनही निवडणूक रिंगणात आहेत, त्यांना जनताच धडा शिकवेल, असे टीकास्त्र विरोधकांनी सोडले आहे.



भाजप विरोधी पक्षात असताना एकनाथ खडसे आणि विनोद तावडे हे विरोधी पक्षनेते होते. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसविरोधात लढताना त्यांनी मोठी कामगिरी बजावली होती. तसेच २०१४ मध्ये विधानसभा निवडणुकीआधी शिवसेनेशी २५ वर्षांची युती तोडण्याची घोषणा ज्येष्ठ नेते या नात्याने खडसे यांनी केली होती. शिवसेनेवर तोफ डागण्याचे काम खडसे यांनी केले होते. सत्ता आल्यावर ज्येष्ठ असल्याने खडसे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या आकांक्षा पल्लवित झाल्या. पण ते न मिळाल्याने त्यांची नाराजी वाढत गेली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सुप्त संघर्ष सुरू झाला. पुण्यातील भोसरी येथे कुटुंबीयांच्या नावे एमआयडीसीच्या संपादनातील वादग्रस्त जमीन खरेदी केल्याने खडसे यांना महसूलमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर खडसे यांनी अनेकदा वादग्रस्त वक्तव्ये केली. त्यामुळे त्यांना भाजपने उमेदवारी नाकारली.

खडसे, तावडे, बावनकुळे, प्रकाश मेहता, विष्णू सावरा, राजकुमार बडोले, दिलीप कांबळे यांच्यासह अनेक मंत्र्यांवर विरोधकांनी भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. काही मंत्र्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी क्लीनचीट दिली, तर काहींना मंत्रिमंडळ विस्तारामध्ये कार्यक्षमतेचा ठपका ठेवून वगळले. निवडणुकीला सामोरे जाताना आणखी काही नेत्यांना उमेदवारी नाकारल्याने त्याची नेमकी कारणे काय, अशी चर्चा सुरू झाली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी कारणे न सांगता उमेदवारी न दिलेल्या नेत्यांना अन्य जबाबदाऱ्या दिल्या जातील, अशी सारवासारव केली आहे.

यासंदर्भात बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते नवाब मलिक म्हणाले, विरोधकांनी २१ मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले, पण मुख्यमंत्र्यांनी कारवाई करण्याऐवजी त्यांना क्लीनचीट दिली. जनतेसमोर जाताना अडचण होऊ नये म्हणून आता कारवाई केली आहे. आता जनताच भ्रष्टाचारी नेत्यांना घरी पाठवेल.

# संजय निरुपम यांची काँग्रेसला धमकी

**मुंबई-** काँग्रेसचे नेते संजय निरुपम यांनी पक्षाच्या निर्णय प्रक्रियेवर नाराजी व्यक्त करीत विधानसभा निवडणुकीत प्रचार करणार नसल्याचे आज जाहीर केले. पक्षातही फार काळ राहणार नसल्याचे त्यांनी सुतोवाच केले.

देवरा यांचे काँग्रेसमधील स्थानिक नेत्यांशी फारसे पटले नाही. त्यांच्यातील वाद अनेकदा चव्हाट्यावर आले होते. निरुपम यांनी देवरा यांच्यावर आज जोरदार टीका केली. निरुपम म्हणाले, ''मी इतक्यात पक्षाचा राजीनामा देईन असे वाटत नाही, पण पक्षात अशाच पद्धतीने काम सुरू राहिल्यास मी पक्षात



फार काळ राहू शकणार नाही. मी एकाचीच उमेदवारीसाठी शिफारस केली होती, तीही मान्य झाली नाही. या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारातही मी भाग घेणार नाही.''

मुंबई प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना निरुपम यांनी आक्रमकपणे काम केले. प्रथम शिवसेनेतर्फे आणि नंतर काँग्रेसतर्फे असे सलग दोनवेळा ते राज्यसभेचे सभासद होते. निरुपम २००९ मध्ये लोकसभेवर निवडून आले. त्यांनी आक्रमकपणे काम केल्याने मुंबईतील उत्तर भारतीयांमध्ये त्यांची क्रेझ निर्माण झाली होती. मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेस पराभूत झाल्यानंतर त्यांनी अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता.

# 'शिवसेना भाजपाला मतदान करणाऱ्या मुंबईकरांनी 'आरे'बद्दल न बोलेलेच बरे'; काँग्रेसचा टोला



**मुंबई-** 'शिवसेना आणि भाजपाला मत देण्याच्या तयारी असणाऱ्या मुंबईकरांनी आरेबद्दल मगरीचे अश्रू ढाळणे बंद करावे' असा टोला काँग्रेसने लगावला आहे. काँग्रेसचे प्रवक्ते संजय झा यांनी ट्विटवरुन आरे येथील ४०० हून अधिक झाडे कापण्यात आल्याच्या कारवाईला विरोध दर्शवला आहे. उच्च न्यायलयाने शुक्रवारी संध्याकाळी आरे येथील मुंबई मेट्रो तीनच्या जागेसाठी वृक्षतोड करण्यासाठी परवानगी दिली. त्यानंतर एका रात्रीत प्रशासनाने काही शे झाडे कापली. आरेमध्ये वृक्षतोड सुरु असल्याचे वृत्त समजताच अनेक पर्यावरणप्रेमींनी आरे कारशेडच्या ठिकाणी धाव घेतली. ट्विटवरही या घटनेचे पडसाद दिसून आले. #AareyForest हा हॅशटॅग शुक्रवार रात्रीपासून ट्विटरवर टॉप ट्रेंण्ड होत आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते असणाऱ्या झा यांनी या वृक्षतोड करण्याच्या निर्णयाला राज्यातील युती सरकारला जबाबदार असल्याचे अप्रत्यक्षरित्या म्हटले आहे. तसेच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी शिवसेना भाजपाला मत देण्याच्या तयारीत असलेल्यांना आरेसाठी आंदोलन करण्याचा अधिकार नसल्याचे आपल्या ट्विटमधून म्हटले आहे. 'ज्या ज्या मुंबईकरांनी शिवसेना आणि भाजपाला मत देण्याचा निर्णय घेतला आहे त्यांनी आरेसाठी मगरीचे अश्रू ढाळणे बंद करावे अशी नम्र विनंती आहे. आरेतील वृक्षतोडीला विरोध करणारे ट्विट करणं तसेच आंदोलन करत असल्याचं नाटकं करणं बंद करा. जे बोलता ते करुन दाखवा,' असा टोला झा यांनी ट्विटवरुन लगावला आहे.

# रिमोट चालत नसल्यामुळेच ठाकरे कुटुंबीय निवडणूक रिंगणात

**मुंबई-** आजवर 'मातोश्री'तून रिमोटद्वारे सत्ता चालविणाऱ्या ठाकरे यांचा रिमोट आता निकामी झाला आहे. रिमोट चालत नसल्यानेच ठाकरे कुटुंबातील आदित्य ठाकरे निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याचा टोला 'एमआयएम'चे अध्यक्ष असोदुद्दीन ओवेसी यांनी शुक्रवारी येथे मारला.

केंद्र सरकारचा राष्ट्रीय नागरिकत्व पडताळणी कायदा घटनाविरोधी असून त्याला विरोध करण्याची घोषणाही ओवेसी यांनी यावेळी केली. विधानसभा निवडणुकीसाठी 'एमआयएम'ने राज्यात ५२ उमेदवार रिंगणात उतरवले. या उमेदवारांच्या प्रचारासाठी राज्यात आलेल्या ओवेसी यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना २०१४च्या निवडणुकीपेक्षा यावेळी पक्षाला चांगले यश मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी प्रदेशाध्यक्ष खासदार इम्तियाज जलिल आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

मागील विधानसभा निवडणुकीत पक्षाला राज्यात दोन जागा मिळाल्या होत्या. तर यावेळी लोकसभा निवडणुकीत एक खासदार निवडून आला असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही पक्षाला चांगले यश मिळत आहे. मात्र यावर आपण समाधानी नसून विधानसभा निवडणुकीत ५२ जागांवर उमेदवार उभे करताना धनगर, वंजारी, मातंग, धोबी,



ख्रिस्ती अशा सर्वच जाती-धर्मातील लोकांना प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारी यासारख्या प्रश्नांवर निवडणुकीत चर्चा होऊन सरकारचे अपयश उजेडात येऊ नये यासाठीच या निवडणुकीचा प्रचार ३७० कलमाभोवती फिरविण्याची सेना-भाजपची खेळी असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीबरोबरची युती दुर्दैवाने तुटल्याचेही त्यांनी सांगितले.

पृष्ठ १ वरुन

## आरे वृक्षतोडीला सुप्रीम कोर्टाची तूर्त स्थगिती

तर त्यांना तात्काळ सोडण्यात येईल, अशी हमी त्यांनी दिली. खंडपीठाने प्रशासनाला वरीलप्रमाणे आदेश दिल्यानंतर या विषयावरील पुढील सुनावणी सुप्रीम कोर्टात पर्यावरणविषयक विषयांवर असलेल्या 'वन खंडपीठ'समोर २१ ऑक्टोबरला होईल, असे स्पष्ट केले.

सरकारच्या वतीने युक्तीवाद करणारे वकील तुषार मेहता यांनीच कोर्टाला विनंती केली की जोपर्यंत या प्रकरणी स्पष्ट निर्णय होत नाही तोपर्यंत वृक्षतोडीला स्थगिती द्यावी. मेट्रो कारशेडसाठी जितकी वृक्षतोड आवश्यक होती, तितकी करण्यात आली आहे, असेही राज्य सरकारच्या वतीने सांगण्यात आले. आरेतील ज्या जमिनीवर वृक्षतोड होत आहे, ती जमीन वनक्षेत्राचा भाग आहे की नाही ते पाहिल्यावर, तसेच या प्रकरणी दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालय निर्णयाप्रत येत नाही, तोपर्यंत या वृक्षतोडीला स्थगिती देण्यात आली आहे.

आरे हे जंगल नाही, असे नमूद करत मुंबई हायकोर्टाने तेथील वृक्षतोडीस स्थगिती देण्यास नकार दिला होता. त्यानंतर लगेचच शुक्रवारी रात्रीच्या अंधारात झाडांची कत्तल सुरू करण्यात आली. स्थानिक नागरिक, आदिवासी बांधव तसेच पर्यावरण प्रेमींनी या वृक्षतोडीला कडाडून विरोध केला. शनिवारी दिवसभरही आरे बचावसाठी नागरिक आक्रमक होते. शिवसेनेच्या माजी महापौर शुभा राऊळ, प्रवक्त्या प्रियांका चतुर्वेदी यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. राष्ट्रवादीचे सरचिटणीस जितेंद्र आव्हाड यांनीही आरेत धडक देऊन सरकारच्या कृतीचा निषेध केला. याप्रकरणी आंदोलन चिघळलेलंच असून आज वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालीही आंदोलन झाले. त्यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. एकीकडे पोलीस आंदोलन चिरडून आरेतील झाडांवर कुऱ्हाड चालवत असताना आता सुप्रीम कोर्टानेच याची गंभीर दखल घेतल्याने 'आरे बचाव'ला तूर्त तरी दिलासा मिळाला आहे.

# मुंबईत चार महिन्यात चार वेळा या कारणांसाठी लागू झाला जमावबंदीचा आदेश

**मुंबई-** आरेमधील मेट्रो कारशेड उभारण्यात येणाऱ्या परिसरात जमावबंदीचे कलम १४४ लागू करण्यात आल्याची माहिती मुंबई पोलिसांकडून देण्यात आली आहे. शुक्रवारी रात्री आरेतील मेट्रो कारशेड उभारण्यात येणाऱ्या परिसरातील झाडं कापल्याचा प्रकार समोर आल्यानंतर पर्यावरण प्रेमींकडून आंदोलन करण्यात आलं होतं. त्या पार्श्वभूमीवर या परिसरात कलम १४४ लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र अशाप्रकारे मुंबईमधील विशिष्ट भागामध्ये जमावबंदीचे कलम लागू करण्याची ही मागील चार महिन्यातील चौथी घटना आहे. जाणून घेऊयात हे कलम नक्की आहे तरी काय आणि कधी व कशासाठी लागू करण्यात आले होते.



कलम १४४ हे फौजदारी दंडसंहिता १९७३ मधील कलम आहे. हे कलम अश्या ठिकाणी लागू केले जाते जिथे मोठ्या संख्येने जमाव गोळा झाल्याने कायदा आणि सुव्यवस्था हातात घेतली जाण्याची वा दंगलीची संभावना असेल. हे कलम लागू असणाऱ्या परिसरामध्ये चार किंवा जास्त लोकांना एकत्र येण्यास बंदी असते. जमावबंदीला इंग्रजीमध्ये र्ण्लैं असेसुद्धा म्हणतात.

जमावबंदीचा आदेश हा जिल्हाधिकारी किंवा जिल्हा न्याय दंडाधिकारी किंवा इतर कार्यकारी दंडाधिकारी देऊ शकतात.

यात वर नमूद अधिकारी फौजदारी दंडसंहिता १९७३ मधील कलम १३४ अन्वये नोटीस पाठवून एखाद्या ठरविक व्यक्तीला काही खास कृती करण्यापासून प्रतिबंध घालण्याचे निर्देश देऊ शकतात. मात्र यासाठी काही अटी आणि नियम आहेत. अशी नोटीस एका खास भागात राहणाऱ्या व्यक्तींवर किंवा लोकांवर व त्या भागाला भेट देणाऱ्या लोकांवर सुद्धा बजावली जाऊ शकते. कोणत्याही भागामध्ये दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ जमावबंदीचा आदेश लागू करता येत नाही. एखाद्या ठिकाणी दोन महिने जमावबंदी लागू केल्यानंतर ती संपुष्टात आल्यावर पुन्हा नव्याने जमावबंदीचा आदेश काढता येतो. पण जर राज्य सरकारला वाटले नागरिकांच्या जीविताला धोका व आरोग्याला धोका असेल व दंगलीची संभावना असेल असे वाटले तर ही जमावबंदी ६ महिन्यांपर्यंत सुद्धा लागू केली जाऊ शकते.

# दसऱ्याच्या दिवशी सोने म्हणून आपट्याची पाने का देतात?



**शमीची पाने :** दसऱ्याच्या दिवशी शमीची पाने एकमेकांना प्रदान करू नयेत, तर ती पाने आपल्या वास्तूत ठेवावीत. यामुळे वास्तूतील वायूमंडल शुद्ध होण्यास मदत होते. शमी ही तेजतत्त्वरूपी आहे. ही तम-रजात्मक असल्याने तिच्यातून प्रक्षेपित होणारे तेजकण हे वातावरणात आगीची निर्मिती करतात. या सूक्ष्म ज्वाळांनी जिवाचा क्षात्रभाव जागृत होण्यास मदत होते. क्षात्रभाव हा आत्मशक्तीच्या बळावर जिवाला संस्कारात्मक अशा क्षात्रवृत्तीकडे नेतो. वनवासाला जातांना प्रभू श्रीरामचंद्रांनी शमीच्या झाडाच्या ढोलीत शस्त्रे ठेवली होती. शमीच्या खोडातून व पानांतून उत्पन्न होणाऱ्या तेजतत्त्वरूपी धगीमुळे शस्त्रांतील सुप्त मारक शक्ती अखंड कार्यरत अवस्थेला राहू शकते. या वेळी प्रभू श्रीरामचंद्रांनी जरी शस्त्रे उतरवली, तरी त्यांनी या शस्त्रांच्या माध्यमातून मारक शक्ती दुर्जनांवर सोडून शमीपत्रांच्या साहाय्याने संपूर्ण ब्रह्मांडात मारक तत्त्वाचे कार्य केले. दसऱ्याच्या दिवशी श्रीरामाचे तारक, तर हनुमानाचे मारक तत्त्व कार्यरत असल्याने शमीपत्र हे ते ते तत्त्व आकृष्ट करून घेऊन ते वायूमंडलात प्रक्षेपित करण्याचे महत्त्वाचे कार्य करते.

**आपट्याची पाने :** ही आप व तेज या कणांशी निगडित असल्याने शमीकडून प्रक्षेपित झालेल्या लहरी या आपट्याच्या पानांकडून ग्रहण केल्या जाऊन त्या आपतत्त्वाच्या बळावर प्रवाही बनवल्या जातात व जेव्हा या आपट्यांच्या पानांचे आदान-प्रदान होते, त्या वेळी हे तेजतत्त्वरूपी कण आपट्याच्या पानातून जिवाच्या तळहाताकडे संक्रमित होतात. यामुळे जिवाच्या हातावरील देवतांच्या स्थानांचे बिंदू कार्यरत होऊन त्या बिंदूतून ते ते आवश्यक तत्त्व जिवाच्या सूक्ष्मदेहापर्यंत आपकणांच्या साहाय्याने झिरपले जाते. या कारणास्तव शमीची पाने घरात ठेवून दसऱ्याच्या दिवशी वायूमंडलाची शुद्धी करावी व त्यानंतर आपट्याच्या पानांतून तेजतत्त्व एकमेकांना प्रदान करून ईश्वरी राज्य स्थापनेला लागणारा क्षात्रभाव जागृत अवस्थेत ठेवावा.

## संपादकीय...

# स्वागतार्ह निकाल!


संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक

भारतात कोणताही विकास प्रकल्प उभा राहू लागला की, काहीजणांना त्यामुळे लक्षावधी नागरिकांची होणारी सोय दिसत नाही. त्यांचे कमी होणारे काबाडकष्ट जाणवत नाहीत. त्यांना पर्यावरणाची हानी, वृक्षतोड किंवा निसर्गाला बसू शकणारे धक्के तेवढे दिसायला लागतात. दोन कोटींहून जास्त महामुंबईकरांचे रोजचे कष्टप्रद जीवन सुसह्य करू शकणाऱ्या 'मेट्रो' प्रकल्पाबाबतही तसेच झाले यात आश्चर्य नाही. मुंबईतल्या आरे कॉलनीत होणाऱ्या मेट्रोच्या कारशेडला आव्हान देणाऱ्या काही याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या. शुक्रवारी मुख्य न्यायमूर्ती प्रदीप नंदराजोग आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांनी त्या सर्व फेटाळून लावल्याने आरे कॉलनीत मेट्रोची कारशेड होण्यातील अडचण तूर्ततरी दूर झाली आहे. हे याचिकादार उद्या सर्वोच्च न्यायालयातही जाऊ शकतात. मात्र, त्यांचे युक्तिवाद अयोग्य असल्याचे निरीक्षण खंडपीठाने निकालात नोंदवले आहे, हे विसरता कामा नये. आरे कॉलनी हा संरक्षित जंगलाचा एक भाग आहे आणि तेथील कारशेडसाठीची तीन हजार वृक्षांची तोड ही अपरिमित हानी आहे आणि त्यामुळे ही प्रस्तावित कारशेड इथे होऊच नये, असा याचिकादारांचा दावा होता. पण आरे कॉलनी हा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा भाग नाही आणि त्यामुळे ते संरक्षित वनही नाही, हा सरकारपक्षाचा दावा उच्च न्यायालयाने मानला आहे. खरेतर, राज्यात युतीचे सरकार असताना भाजप आणि शिवसेना यांची याबाबतची भूमिका समान असायला हवी होती. शिवसेनेचे युवानेते आदित्य ठाकरे हे कालपरवापर्यंत या कारशेडला विरोध करीत होते. त्याहूनही आश्चर्य म्हणजे, मुंबई महापालिकेतील स्थायी समितीचे अध्यक्ष आणि शिवसेनेचे नेते यशवंत जाधव यांनीही 'आमचा मेट्रोला विरोध नाही, मात्र वृक्षतोड म्हणजे निसर्गाची हानी आणि आदिवासींच्या चरितार्थावर पाय' असा दावा करीत उच्च न्यायालयात याचिका केली होती. राज्यात युतीचे सरकार असताना राज्याच्या हिताच्या एका महाप्रकल्पाच्या अंमलबजावणीवर दोन्ही पक्षांचे एकमत नसावे आणि त्यांनीच परत महायुती करून मतदारांकडे मतांचा एकत्रित जोगवा मागावा, हे खरोखर नवल आहे. उच्च न्यायालयाने यशवंत जाधव यांना निराधार याचिका दाखल केल्याबद्दल ५० हजार रुपयांचा दंड ठोठवला आहे, यातूनच या प्रकल्पात अडचणी निर्माण करण्याचे प्रयत्न कोणत्या थराला गेले होते, हे लक्षात यावे. जाधव हे वृक्ष प्राधिकरणाचेही सदस्य आहेत. आणि या प्राधिकरणाने हे प्रकरण गंभीरपणे विषय न हाताळताच वृक्षतोडीला अनुमती दिली, असा दावा जाधव यांनीच केला. तो न्यायालयाने ग्राह्य मानला नाही. वृक्ष प्राधिकरणाने तज्ज्ञांचा सल्ला न मानता वृक्षतोडीला अनुमती दिली, हा दावाही न्यायालयात टिकलेला नाही. यावरून, या न्यायालयीन लढाईमागच्या सुप्त राजकीय हेतूंवरही प्रकाश पडावा.



भारतासारख्या विकसनशील देशात आधीच प्रकल्पांचे प्राधान्यक्रम ठरविताना दमछाक होते. त्यातही हात घातलेले प्रकल्प दशकानुदशके गती घेत नाहीत. मुंबईत मेट्रो किमान वीस वर्षे आधीच धावायला हवी होती. आता गेल्या पाच वर्षामध्ये या प्रकल्पाला गती येत असताना त्यात काही ना काही अडथळे येणे किंवा आणले जाणे, हे मुळीच लोकहिताचे नाही. दुसरे म्हणजे, ज्या पर्यावरणाची काळजी याचिकादारांना वाटते, त्याचे खरेतर संरक्षणच मेट्रोमुळे होणार आहे. आज लक्षावधी वाहने अखंड ओकत असलेला धूर व पर्यायाने कार्बन फूटप्रिंट मेट्रोमुळे कमी होणार आहे. लक्षावधी महामुंबईकर दररोज जनावरांसारखा लोकलप्रवास करतात. त्यांना मेट्रोमुळे थोडासा आरामदायी प्रवास करता आला तर त्याचे फळ शेवटी देशाच्या आर्थिक विकासाच्या आणि एकूण जीवनमान उंचावण्याच्या रूपाने मिळणार आहेच. वनसंपदा, वन्यजीव आणि मूळ रहिवासी यांच्यावरचे आधुनिक विकास हे एक मोठे संकट आहे, अशा प्रकारचा युक्तिवाद करीत राहून वेगवेगळ्या प्रकल्पांना विविध पातळीवर सतत विरोध करीत राहायचा, हे तंत्र गेल्या काही दशकांत चांगलेच विकसित झाले आहे. भारतासारखा झपाट्याने विकास करू पाहणारा देश अशा मोहिमांचा अनेकदा शिकार बनला आहे. अनेकदा अशी कारस्थाने जागतिक पातळीवर शिजतात आणि त्यांची अंमलबजावणी मात्र मोठ्या गोंडस रूपात, स्थानिकांची माथी फिरवून केली जाते. मुंबई मेट्रोच्या विरोधात उभ्या राहिलेल्या लढाया या निखळ निसर्गाच्या प्रेमाच्या की भारताच्या विकासाच्या विरोधातल्या, असा प्रश्न त्यामुळेच पडतो. विकास आणि निसर्गरक्षण या दोन्हींचा समतोल हे आव्हान आहेच. मात्र, माणूस हाही या निसर्गाचाच एक घटक आहे आणि त्याच्या दूरगामी हिताचे प्रकल्प निसर्गाच्या विरोधातले कसे काय ठरतात?

# खुली राजकीय व्यवस्था!




**समाजमाध्यमांचा चांगला उपयोग करून घेतला तर निश्चित उपयुक्त चर्चा, विचारांची देवाण-घेवाण आणि माहितीचा खजिना हाती लागू शकतो. दोन दिवसांपूर्वी असाच एक संदेश (किंवा निवेदन म्हणा) सध्याच्या राजकीय घडामोडींवर पडला होता. त्यात सध्याच्या राजकीय व्यवस्थेला 'खुली राजकीय व्यवस्था' म्हटले होते आणि ती १९९१ मध्ये देशाने स्वीकारलेल्या खुल्या अर्थव्यवस्थेप्रमाणे आहे, असे म्हटले होते. त्या निवेदनात म्हटले होते की, ''देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय राम कदम यांना उमेदवारी मिळाली; परंतु विनोद तावडे यांची उमेदवारी कापली गेली! आर्थिक उदारीकरणात आयातीवरील निर्बंध उठतात. राजकीय उदारीकरणात भाजपमध्ये आयातीत आयारामांचे महत्त्व वाढले आहे. ही सर्व नेतेमंडळी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील धनदांडगी मंडळी आहेत. त्यामुळे तेथून ती आयात करण्यात आली. ज्यांना बाजारात किंमत नाही, असे अनेक नेते काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये राहिली.**

अर्थात अनेक निष्ठावंतही पक्ष सोडून गेले नाहीत. त्यांना मानायला हवे. परंतु जशी संरक्षित आणि निर्बंधित अर्थव्यवस्था संपुष्टात आली, त्याचप्रमाणे आयुष्यभर एकाच राजकीय पक्षात हे दिवसही सरले! त्यामुळे नवीन घरोबा करायचा आणि 'हृदयात समथिंग समथिंग' असं म्हणत राहायचं... जायचं भाजपात आणि हृदयात शरद पवार यांना ठेवायचं, असं सर्व सुरू आहे! ही एक खुली राजकीय व्यवस्था निर्माण झाली आहे...!

यशवंतराव चव्हाण यांची महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेकडे पाहण्याची विशाल दृष्टी दिसते. म्हटले तर तो प्रश्न खोचकही होता. उत्तर मात्र विशाल दृष्टिकोन आणि दिशादर्शक होते. पत्रकारांनी खोचक प्रश्न उपस्थित करायलाच हवेत. ते त्यांचे कर्तव्यच असते. त्यांच्या प्रश्नांने आज साठ वर्षे होत असलेल्या महाराष्ट्राची दिशा स्पष्ट केलेली होती.

ही दिशा आज अदृश्य झाल्यासारखे वाटते. ती कोणी स्वीकारण्याच्या मानसिकतेतही नाही, किंबहुना महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर ज्या दिशेने जायचे ठरविले होते, ती अर्धवट सोडून दिल्याप्रमाणे दिसते. नागपूर करार किंवा मराठवाड्याचे महाराष्ट्रातील विलीनीकरण करताना जो शब्द आपण दिला होता तो पूर्ण होत नाही.असमतोल विकास हा महाराष्ट्राच्या वाटचालीतील सर्वांत मोठा अडसर ठरू पाहतो आहे. कृष्णा खोऱ्याचा अपवाद वगळता गोदावरी, वैनगंगा किंवा नर्मदेच्या खो-यांतील सुपीकतेला अद्याप साद घालण्याचे राहून गेले आहे. विदर्भ, मराठवाड्यासह महाराष्ट्रातील निम्म्याहून अधिक जिल्हे मागास राज्यातील स्थितीप्रमाणे आज आहेत. त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या सरकारने दूरगामी धोरणे आखली नाहीत. तशीच ती देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आखली नाहीत.

दुसरा महत्त्वाचा अडथळा किंवा अडसर हा कोरडवाहू शेतीचा आहे. ऐंशी टक्के शेती कोरडवाहू ठेवून केवळ ७० हजार कोटींचा घोटाळा म्हणून ऊर बडवून घेण्यात काही अर्थ नाही, असे घोटाळे होऊ नयेत आणि प्रत्येक पैन् पै सिंचनावर खर्च झाला पाहिजे, यासाठी काही दिशादर्शक धोरण गेल्या पाच वर्षांत आखले का? याचे उत्तर नाही, असेच येते. दरवर्षी वीस हजार कोटींची तरतूद केली असती तर एक लाख कोटी रुपयांमध्ये महाराष्ट्रातील सर्व अर्धवट सिंचन प्रकल्प पूर्ण होऊन जवळपास ३५ टक्के जमीन ओलिताखाली आली असती. जे काम शेजारच्या नव्याने स्थापन झालेल्या तेलंगणा राज्यात होऊ घातले आहे. महाराष्ट्रापेक्षा कितीतरी मोठ्या उपसा जलसिंचन योजना तीन वर्षांत पूर्ण केल्या. त्याच्या उद्घाटनाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीही गेले होते. महाराष्ट्रातील मोठ्या उपसा जलसिंचन योजना तीस वर्षे पूर्ण होत नाहीत. उद्योग, पायाभूत सुविधा, रस्ते, महामार्ग, शहरीकरण, आदी पातळीवर हीच अवस्था आहे. आनंद आगाशे बारा वर्षांपूर्वी पुणे शहरातील वाढत्या वाहतुकीवर पोटतिडकीने लिहीत होते. आता त्यांना चारचाकी गाडी पुण्यातून चालविता येत नाही म्हणून दुचाकी किंवा एस.टी., रिक्षाच्या आधारे प्रवास करतात. वाढत्या शहरीकरणाला-देखील दिशा नाही. मुंबईनंतर सर्वच वाढत्या शहरांची दैन्यावस्था होत आहे. लातूर, उस्मानाबाद, जालना, बार्शी, परभणी, नांदेड, औरंगाबाद, अकोला, अमरावती, आदी शहरांना आठवड्यातून एकदा पिण्याचे पाणी मिळते. हीच काय ती महाराष्ट्राची दिशा आहे? अशा परिस्थितीत चर्चा कशाची होते? तर आयाराम- गयाराम यांची! साधनसुचितेचा दावा करणा-या भाजपला कोणीही चालतो. बार्शीचे दिलीप सोपल चालतात आणि विनोद तावडे, एकनाथ खडसे या आयुष्य काढलेल्यांना बाजूला ठेवले जाते. त्यांना उमेदवारी का नाकारली, हे तरी महाराष्ट्राला सांगा, असे म्हटले होते. ते सांगण्याचे कर्तव्य होते. त्यांच्या प्रचारावर विश्वास ठेवून महाराष्ट्रातील जनतेने भाजपला मागील निवडणुकीत मते दिली होती. यासाठीच या व्यवस्थेला खुली व्यवस्था म्हटली पाहिजे. या खुल्या व्यवस्थेत वारेमाप आश्वासने, जनतेच्या गरजा आणि अपेक्षांचा विचार न करता आखलेली धोरणे, तसेच ती पाळलीच पाहिजेत, याचे कोणतेही नैतिक बंधन असता कामा नये, अशी ही राजकीय व्यवस्था आहे. महाराष्ट्राची लूट केली, असा आरोप करणारे विरोधी पक्षनेते आज त्या सरकारच्या कामगिरीचे गोडवे गाणार आहेत. शरद पवार यांच्या मागे राहून सरकारला वेठीस धरू म्हणणारे त्या पक्षाच्या उमेदवारीवर फडणवीस यांची तारीफ करणार आहेत. तेच शरद पवार शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर सरकारला जाब विचारू लागले आहेत.

मराठी माणसांचा विषय निघाला म्हणून नोंद घेतली पाहिजे की, मराठी माणसाला मराठी नाटके पाहण्याची सोयसुद्धा या राज्यात करता आली नाही. ज्यांनी मराठी विश्वकोश निर्मितीसाठी खास सोय राज्याच्या निर्मितीनंतर तातडीने केली, त्या राज्याला सांस्कृतिक धोरणच नसावे, हे ज्ञानाच्या दारिद्र्याचे लक्षण नव्हे का? जाती-पातीवरून भांडणे लागण्याचे कारणही तेच आहे. प्रत्येक माणसाला आपल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी समानतेचा धागाच हाती लागत नाही. तेव्हा जातीचा आधार घेऊन तरी पाहू म्हणून माणसं जातीवर लाखा-लाखांनी रस्त्यावर येऊ लागली. हा तर महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, सत्यशोधकी चळवळीचा, फुले-शाहू-आंबेडकर विचारांचा पराभवच आहे. अन्यथा, हा मार्ग आम्ही सोडला आहे, असे तरी सर्वच राजकीय पक्षांनी जाहीर करून टाकावे.

या राज्यकर्त्यांच्या खुल्या राजकारणाने मराठी माणसाला कोणत्या दिशेने जावे हेच समजत नाही. कोणाच्या मागे जावे, साखर कारखाना बुडविणारा भाजपमध्ये, पतसंस्था बुडविणारा पण भाजपमध्ये आणि सर्व राजकारणातून बाद झालेला त्याच्या विरोधात लढणार म्हणतो आहे, अशा खुल्या राजकीय व्यवस्थेत निवड कोणाची करायची? गेल्या पाच वर्षांतील कामगिरी दिशादर्शक आहे का? मागील चुका सुधारल्यात का? पुन्हा जुनेच आले तर ही व्यवस्था सुधारणार का? आपण सारे या विचारधनाऐवजी खुल्या राजकीय व्यवस्थेचे बळी ठरत आहोत.

# मीरा भाईदरमध्ये भाजपमधील बंडखोरी आणि समस्यांचे आव्हान



**भाईदर - २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपासून ते २०१७ मध्ये झालेल्या मीरा भाईदर महनगरपालिकेच्या निवडणुकीपर्यंत सातत्याने भाजपच्या पाठीशी उभा राहणाऱ्या मीरा-भाईदर विधानसभा मतदारसंघात यंदा प्रथमच भाजपमधील बंडखोरीमुळे चुरशीची लढत होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे विद्यमान आमदार भाजपचे नरेंद्र मेहता या निवडणुकीत बालेकिल्ला राखण्यात यशस्वी ठरतात का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.**

मतदारसंघांच्या पुनर्रचनेआधी मीरा-भाईंदरचा समावेश त्या वेळच्या बेलापूर विधानसभा मतदारसंघात होता. २००९ मध्ये मीरा-भाईंदर मतदारसंघ अस्तित्वात आला. त्या काळी मीरा-भाईंदरमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व होते. महानगरपालिका देखील त्यांच्याच ताब्यात होती. या मतदारसंघाच्या पहिल्याच निवडणुकीत उमेदवारी मिळविण्यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी मध्ये चुरस लागली होती. काँग्रेसकडून मुझफ्फर हुसेन देखील इच्छुक होते मात्र राष्ट्रवादीने बाजी मारत उमेदवारी पदरात पाडून घेतली. त्यावेळी राष्ट्रवादीचे गिल्बर्ट मेन्डोन्सा विजयी झाले. त्यावेळी शहरात भारतीय जनता पक्षाची ताकद फारशी नसतानाही भाजपच्या नरेंद मेहता यांनी मेन्डोन्सा यांना कडवी झुंज दिल्याने मेन्डोन्सा केवळ १० हजार ६०४ मतांनी विजयी झाले होते.

मात्र या निवडणुकीनंतर भाजपने ताकद प्रयत्नपूर्वक वाढवत नेली आणि त्याचे प्रत्यंतर २०१२ च्या मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या निवडणुकीत दिसून आले. या निवडणुकीत भाजपने पहिल्या क्रमांकाच्या जागा जिंकल्या. त्यानंतर २०१४ मध्ये आलेल्या लोकसभा निवडणुकीने येथील राजकीय चित्रात फार मोठा बदल झाला. देशात त्या वेळी आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लाटेमुळे शहरात भाजपची ताकद मोठया प्रमाणात वाढली. विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे गिल्बर्ट मेन्डोन्सा आणि भाजपचे नरेंद्र मेहता पुन्हा आमने सामने आले. या निवडणुकीत भाजप आणि शिवसेना वेगवेगळी लढली होती. मात्र त्यानंतरही भाजपचे नरेंद्र मेहता यांनी राष्ट्रवादीचे मेन्डोन्सा यांचा ३२ हजार २९२ मतांनी पराभव केला.

भाजपचे विद्यमान आमदार नरेंद्र मेहता आणि माजी महापौर तसेच भाजपच्या विद्यमान गीता जैन यांच्यात विस्तवदेखील जात नाही. गेल्या दोन वर्षांपासून गीता जैन यांनी मेहता यांच्या साम्राज्याला आव्हान देण्यास सुरुवात केली आहे. विधानसभा निवडणुकीत मेहता यांना पुन्हा उमेदवारी मिळू नये यासाठी त्यांनी सर्व ताकद पणाला लावली होती. परंतु त्यांचे प्रयत्न अपुरे पडले आणि भाजपकडून मेहतांनाच पुन्हा उमेदवारी मिळाली. त्यामुळे गीता जैन यांनी बंडखोरी करत निवडणुकीसाठी आपली उमेदवारी दाखल केली आहे. त्यामुळे या निवडणुकीत आता भाजप, काँग्रेस आणि भाजपचा बंडखोर अशी तिरंगी लढत अटळ आहे. गीता जैन या गेल्या काही महिन्यांपासून निवडणुकीची तयारी करत आहेत. नरेंद्र मेहता यांच्या हक्काच्या मतांना सुरुंग लावण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. परिणामी ही निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता असून मेहतांना गड राखण्यासाठी निकराचे प्रयत्न करावे लागणार आहेत. दुसरीकडे या दोघांतील मत विभाजनाचा फायदा उचलण्याची तयारी काँग्रेसकडून सुरू करण्यात आली आहे.

शहरातील काही समस्या मार्गी लागल्या असल्या तरी धोकादायक इमारतींच्या पुनर्बांधणीचा प्रश्न कायम आहे. या इमारतींच्या पुनर्बांधणीबाबतचे धोरण शासनाकडून अद्याप निश्चित करण्यात आलेले नाही. इमारतींच्या मानीव अभिहस्तांतरणात अडथळा ठरणाऱ्या इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनीच्या ना-हरकतीची समस्यादेखील कायम आहे. शहरात काही ठिकठिकाणी सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांचे काम सुरू झाले असले तरी अनेक मुख्य रस्त्यांची आज दयनीय अवस्था झाली आहे. हे रस्ते वारंवार नादुरुस्त होत आहेत. ५०० कोटी रुपयांची भूमिगत गटार योजनादेखील दहा वर्षांत पूर्ण होऊ शकलेली नाही. त्यामुळे पावसाळ्यात ठिकठिकाणी पाणी तुंबण्याच्या त्रासाला नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. झोपडीवासीयांसाठी सुरू झालेली बीएसयूपी योजनाही रेंगाळली आहे. याव्यतिरिक्त शहरात माफक दरात वैद्यकीय उपचार मिळणारे एकही अद्ययावत सरकारी रुग्णालय नाही, फेरीवाल्यांची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे, उत्तनच्या कचऱ्याच्या समस्येवर तोडगा निघालेला नाही, अनधिकृत बांधकामेदेखील फोफावत आहे. अशा अनेक समस्यांची तड अद्याप लागू शकलेली नाही.

गेल्या विधानसभा निवडणुकीत देण्यात आलेल्या कोणत्याही आश्वासनांची पूर्तता झालेली नाही. टेंभा रुग्णालय सरकारकडे हस्तांतर झाले नाही, मुंबईच्या प्रवेशद्वारावरील टोल नाके हटविण्याचे अश्वासन हवेतच विरल्याने दहिसर येथील टोलनाका सुरूच असून त्याचा नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. नागरिकांना २४ तास पाणी देण्याचे आश्वासनदेखील पाळले गेले नाही.

## सिडकोच्या घरांची सोडत २६ नोव्हेंबरला



सिडकोच्या महागृहनिर्मितीतील नऊ हजार आणि जुन्या स्वप्नपूर्ती गृह संकुलातील आठशे घरांची सोडत दिवाळीत २६ नोव्हेंबर रोजी काढण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीमुळे या गृहयोजनेत अर्ज करण्याची मुदत ५ नोव्हेंबपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे दहा हजार नागरिकांचे ऐन दिवाळीत घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

सिडकोने एकूण दोन लाख घरनिर्मितीची घोषणा केली आहे केंद्र सरकारच्या २०२२ पर्यंत सर्वासाठी घर या योजनेतील हा एक भाग आहे. त्यानुसार गेल्या वर्षी १४ हजार ७३८ घरांची सोडत आणि बांधकाम सुरू करण्यात आले आहे. त्यानंतर यंदा सिडकोने ९५ हजार घरांची घोषणा केली असून, त्यातील पहिल्या टप्प्यातील ९ हजार २४९ घरांची अर्ज नोंदणी सुरू करण्यात

आली आहे. त्याची मुदत १८ ऑक्टोबर होती. त्याऐवजी ती आता ५ नोव्हेंबर रोजी करण्यात आली आहे. सिडकोने जुन्या स्वप्नपूर्ती गृहसंकुलातील शिल्लक ८१४ घरांची विक्रीसुद्धा सुरू केली आहे. त्यांची मुदत ५ ऑक्टोबर रोजी संपत होती त्याऐवजी ती ५ नोव्हेंबर करण्यात आली आहे. त्यामुळे दोन्ही योजनांचे अर्ज नोंदणी ५ नोव्हेंबपर्यंत मुदतवाढ आहे.

## भाडोत्री कार्यकर्त्यांचा वधारला भाव ;२०० ऐवजी आता ५०० रुपयांची मागणी

**ठाणे :** विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागली आणि अर्ज भरण्याची प्रक्रियाही आता संपली आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने निवडणुकीला रंग चढणार आहे. परंतु, या निवडणुकीत प्रचार करणाऱ्या 'भाडोत्री' कार्यकर्त्यांनाही मंदीचे चटके भासू लागले आहेत. त्यामुळेच त्यांनी आपला भाव वाढविला आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत खाऊनपिऊन २०० रुपये असणारा या कार्यकर्त्यांचा दर आता ५०० रुपयांवर गेला आहे. त्यामुळे हा कार्यकर्ता या निवडणुकीच्या माध्यमातून आपली मंदी दूर करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु, निवडणुकीत उभ्या असलेल्या उमेदवाराला मात्र या दरवाढीचा फटका बसला आहे.

लोकसभेनंतर सहा महिन्यांतच विधानसभा निवडणूक लागली आहे. त्यानुसार, जिल्ह्यात विविध पक्षांच्या दिग्गज उमेदवारांनी आपले अर्जही दाखल केले आहेत. अर्ज भरताना अनेकांनी जोरदार शक्तिप्रदर्शन केले. तसेच मंगळवारपासून खऱ्या अर्थाने प्रचार रॅली, रोड शो, सभा आदींसह इतर प्रत्येक ठिकाणी उमेदवाराला 'त्या' कार्यकर्त्यांची गरज लागणार आहे. त्यामुळे प्रत्येकाने आधीपासूनच या कार्यकर्त्यांचे बुकिंग केले असून त्यांचे दर जवळपास निश्चित करण्यात आले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या वेळेस हातात झेंडा घेऊन 'आवाज कुणाचा', 'निवडून निवडून येणार कोण', 'बघतोस काय रागाने' अशा घोषणा



देणाऱ्या त्या कार्यकर्त्यांना दिवसाचे २०० रुपये मिळत होते. यामध्ये काही ठिकाणी चहा, नाश्ता, जेवणही मिळत होते. परंतु, आता देशभर मंदीचे सावट आल्याने या मंदीतून सावरण्यासाठी त्या कार्यकर्त्यांनीही आपला भाव वाढवला आहे. आता खाऊनपिऊन ५०० रुपयांचा भाव सुरू असल्याची माहिती आहे. मतदारसंघातील तगड्या उमेदवाराकडे भाडोत्री कार्यकर्त्यांची रीघ लागलेली दिसून येत आहे. पुन्हा निवडणूक लागलीच नसल्याने हीच संधी आहे.

### ठेकेदारांचे रेटकार्ड

इंधन दरवाढीमुळे आधीच उमेदवारांचे कंबरडे मोडले असतांना आता प्रचारासाठी लागणा-या भाडोत्री कार्यकर्त्यांचेही पॅकेज तयार आहे. पहिल्या दिवसापासून निवडणुकीच्या शेवटच्या दिवसापर्यंतचे पॅकज तयार आहे. थेट पॅकेजमध्ये काही प्रमाणात दर कमी केला जात आहे. तसेच किती कार्यकर्ते हवेत, कोणते हवेत, महिला, तरुण, जेष्ठ आदींचीही यादी तयार आहे. त्यानुसार उमेदवाराला जे परवडेल ते मिळत आहे.

## भिकाऱ्याच्या झोपडीत सापडली पावणे दोन लाखाची नाणी

**नवी मुंबई :** लोकलच्या धडकेत मृत पावलेल्या एका भिकाऱ्याच्या झोपडीमध्ये तब्बल पावणे दोन लाख रुपयांच्या नाणी, ८ लाख ७७ हजार रुपये रुपयांचे फिक्स डिपॉझिट सर्टिफिकेट तसेच बँक खात्यामध्ये ९६ हजाराची रक्कम आदी मालमत्ता आढळून आली आहे. या भिकाऱ्याच्या अपघाती मृत्यूनंतर त्याची ओळख पटविण्यासाठी त्याच्या गोवंडी येथील झोपडीत गेलेल्या वाशी रेल्वे पोलिसांच्या हाती ही सर्व मालमत्ता लागली आहे. एका भिकाऱ्याच्या झोपडीमध्ये इतकी मोठी मालमत्ता पाहून पोलीस देखील चक्रावून गेले आहेत.



या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या भिकाऱ्याचे नाव बिरंदीचंद पनारामजी आजाद (७५) असे असून तो टाटानगर गोवंडी भागातील झोपडीत एकटाच राहत होता. मुळचा राजस्थानचा असलेल्या बिरंदीचंद आजाद हा गोवंडी रेल्वे स्टेशन परिसरात भीक मागून आपला उदरनिर्वाह चालवित होता. गत ४ ऑक्टोबर रोजी बिरंदीचंद हा गोवंडी मानखुर्द रेल्वे स्थानकादरम्यान रेल्वे रुळ ओलांडून जात असताना, त्याला लोकलची धडक बसल्याने त्याचा मृत्यू झाला. त्यामुळे वाशी पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक प्रविण कांबळे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पाटोळी आणि हेड कॉन्स्टेबल पाटील यांनी मृत बिरंदीचंद याच्या फोटोवरुन त्याची ओळख पटविण्याचा प्रयत्न सुरु केला असता, तो गोवंडी परिसरात भीक मागत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्याची अधिक माहिती मिळवून टाटानगर गोंवडी येथील त्याची झोपडी शोधून काढली.

## उड्डाणपुलावर मध्यरात्री मद्य मेजवान्या



**भाईदर -** भाईंदर पूर्व-पश्चिम परिसराला जोडणाऱ्या उड्डाणपुलावर रात्रीच्या सुमारास तरुण वर्ग मद्यपान करीत असल्यामुळे फेरफटका मारायला निघालेल्या रहिवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. इंदिरा गांधी उड्डाणपुलावर हे सारे प्रकार सुरू आहेत. भाईंदर पूर्व-पश्चिम परिसराला जोडण्यात आलेल्या या पुलावर दिवसभर सतत रहदारी सुरू असते. परंतु याच उड्डाणपुलावर रात्रीच्या सुमारास तरुणांकडून मद्य मेजवान्या झडत आहेत. या साऱ्या प्रकारामुळे परिसरात रहिवाशांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

भाईंदर पश्चिम परिसरात अनेक पर्यटकस्थळ असल्यामुळे मोठ्या संख्येने प्रवासी या उड्डाणपुलाचा वापर करत असतात. याच उड्डाणपुलाचा वापर सध्या तरुण मद्य मेजवान्यांसाठी करीत असल्याचे समोर आले आहे. अनेकदा या मेजवान्या झडल्यानंतर शिल्लक बाटल्या रस्त्यावर तशाच पडून असतात. त्यामुळे सर्वत्र कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. अनेकदा तरुणांचे मद्यच्या नशेत भांडणे होत असतात. या मद्यपींशिवाय या उड्डाणपुलावर प्रेमीयुगुलांचीही हजेरी असल्याच्या अनेकांनी तक्रारी केल्या आहेत. मद्यपींना आता पोलिसांची भीती राहिलेली नाही आणि पोलीसही अशा घटनांकडे दुर्लक्ष करीत आहेत, असे रोहित पाटील यांनी सांगितले.

# चंद्रकांत पाटलांविरोधात 'पुणे पॅटर्न', ब्राह्मण संघटना ठरणार डोकेदुखी

**पुणे-** विधानसभा निवडणुकीतही विरोधकांनी पुणे पॅटर्नची परंपरा कायम ठेवली आहे. कोथरूडमध्ये चंद्रकांत पाटील यांच्या विरोधात सर्वपक्षीय विरोधकांनी मनसेच्या किशोर शिंदेंना उतरवलंय. तर दुसरीकडे ब्राह्मण संघटनेच्या २ उमेदवारांनीही मैदानात उडी घेतल्याने कोथरुडच्या लढतीत वेगळेच रंग भरले आहे.



कोथरूडमध्ये भाजपच्या चंद्रकांत पाटलांनी शिवसेनेच्या चंद्रकांत मोकाटेंना आपल्या बाजूला वळवून घेतल्याने तिथली लढत आता एकतर्फीच होणार असं वाटलं होतं. पण विरोधकांनी मनसेच्या किशोर शिंदेंना पाठिंबा जाहीर करून पुन्हा एकदा एक नवाच पुणे पॅटर्न जन्माला घातला. विशेष म्हणजे कोथरूड मतदारसंघात मनसेला काँग्रेस आघाडीने पाठिंबा देण्याचा निर्णय हा स्थानिक पातळीवर झाल्याचं सांगायलाही आघाडीवाले विसरले नाहीत. दुसरीकडे भाजपने मेधा कुलकर्णी यांना डावलल्याने ब्राह्मण संघटना आक्रमक झाल्यात. विश्वजित देशपांडे आणि मयुरेश अरगडे असे एक सोडून २ उमेदवार ब्राह्मण महासंघाने कोथरूडच्या मैदानात उतरवलेत.

पुणे पालिकेत सुरेश कलमाडी यांना सत्तेपासून बाजूला ठेवण्यासाठी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आले होते.

# शिवसेना खासदाराच्या मुलानेच केली पक्षाविरुद्ध बंडखोरी, डोकेदुखी वाढणार

**मुंबई-** विधानसभा निवडणुकीपूर्वी शिवसेना आणि भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात इनकमिंग झालं. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत युतीची स्थिती मजबूत दिसत होती. मात्र तिकीटवाटपानंतर दोन्ही पक्षांना बंडखोरीचं ग्रहण लागलं आहे.

तिकीट न मिळाल्याने शिवसेना-भाजपमध्ये नाराज झालेल्या काही नेत्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादीची वाट धरली तर काहींनी अपक्ष लढणं पसंत केलं. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी तर अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. श्रीरामपूरमध्ये शिवसेनेच्या खासदारपुत्रानेच बंडखोरी केली आहे.

शिवसेना खासदार सदाशिव लोखंडे यांचे चिरंजीव चेतन लोखंडे यांनी पक्षाकडे श्रीरामपूर मतदारसंघातून विधानसभेची उमेदवारी मागितली होती. मात्र पक्षाने त्यांना डावलून नुकताच काँग्रेसमधून शिवसेनेत प्रवेश केलेल्या भाऊसाहेब कांबळे यांना तिकीट दिलं. त्यामुळे नाराज झालेल्या चेतन लोखंडे यांनी श्रीरामपूरमधून अपक्ष अर्ज दाखल केला आहे.

मतदारसंघात उमेदवारीसाठी मोठ्या प्रमाणात होणाऱ्या स्पर्धेतून युतीला बंडखोरीचा सामना करावा लागत आहे. कणकवलीमध्ये भाजपने नितेश राणे यांना उमेदवारी दिल्यानंतर शिवसेनेनं आक्रमक भूमिका घेतली आहे. कोकणातल्या कणकवलीत पुन्हा एकदा राणे विरुद्ध शिवसेना असा सामना रंगाणार आहे. अखेरच्या दिवशी भाजपने नितेश राणे यांना भाजपमध्ये प्रवेश देत AB फॉर्म दिला.

राज्यात युती असली तरी कणकवलीत मात्र 'युती' तुटल्यातच जमा आहे. कारण भाजपचे उमेदवार असलेले नितेश राणे यांना कुठल्याही परिस्थितीत शिवसेनेला पाठिंबा देणार नसल्याचं स्पष्ट झालंय. शिवसेनेचे संपर्क प्रमुख अरुण दुधवाडकर यांनी राणेंना पाठिंबा नसल्याचं स्पष्ट केलं आहे. शिवसेनेने सतीश सावंत यांना पाठिंबा देत AB फॉर्म दिलाय. AB फॉर्म दिल्यामुळे ते सेनेचे अधिकृत उमेदवार ठरले आहेत.

# युतीत धुमशान; नितेश राणेंविरुद्ध शिवसेनेचे सावंत मैदानात

**सिंधुदुर्ग-** शिवसेनेचा तीव्र विरोध असतानाही भाजपने माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांचे पुत्र नितेश राणे यांना पक्षात प्रवेश देऊन कणकवली विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिवसेना-भाजप युतीत वादाची ठिणगी पडली आहे. शिवसेनेने उघडपणे नितेश राणे यांच्या उमेदवारीला आव्हान देत नुकतेच राणेंची साथ सोडून



शिवसेनेत आलेले सतीश सावंत यांना कणकवलीच्या आखाड्यात उतरवले आहे. सावंत यांना पक्षाने एबी फॉर्म दिला असून त्यांनी लगेचच शिवसेनेकडून नितेश राणे यांच्याविरोधात उमेदवारी अर्ज भरला आहे.

माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी आपला महाराष्ट्र स्वाभिमानी पक्ष भाजपमध्ये विलीन करण्याची घोषणा काही दिवसांपूर्वीच केली होती. मात्र, भाजपचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेने राणेंच्या भाजपप्रवेशास कडाडून विरोध केला होता. त्यामुळे राणे व त्यांच्या कुटुंबीयांना वेटिंगवरच राहावे लागले होते. दरम्यान, तीन दिवसांपूर्वीच नारायण राणे यांनी नितेश राणे भाजपच्या तिकिटावरच कणकवलीतून लढणार, असे सांगितले आणि वेगाने घडामोडी घडल्या. गुरुवारी नितेश राणे यांनी भाजपमध्ये अधिकृतरित्या प्रवेश केला आणि त्यांच्या उमेदवारीवरही शिक्कामोर्तब झाले. नितेश राणे यांनी भाजपच्या तिकिटावर कणकवलीतून उमेदवारी अर्ज भरल्यानंतर आज लगेचच सिंधुदुर्गमध्ये राणे विरुद्ध शिवसेना लढाईचा नवा अंक सुरू झाला आहे.

शिवसेनेने सिंधुदुर्गात युती धर्म बाजूला सारून नितेश राणे यांच्याविरोधात सतीश सावंत यांना मैदानात उतरवले आहे. सावंत यांनी आपला उमेदवारी अर्ज भरला असून शिवसेनेचे संपर्कप्रमुख अरुण दुधवडकर यांनी सावंत हे कणकवलीतून शिवसेनेचे अधिकृत उमेदवार असल्याचे स्पष्ट केले आहे. सतीश सावंत हे सिंधुदुर्ग जिल्हा बँकेचे अध्यक्ष आहेत. नारायण राणे यांचे अत्यंत निकटवर्तीय असलेले सावंत काही दिवसांपूर्वीच राणेंची साथ सोडून शिवसेनेत आले आहेत.

नितेश यांच्या कार्यपद्धतीला कंटाळून त्यांनी हा निर्णय घेतला होता. सतीश सावंत यांना कणकवली ग्रामीण भागातून मोठे समर्थन आहे. जिल्हा परिषदेच्या हरकुळ बुद्रुक गटातून त्यांनी सलग तीन वेळा विजय मिळवला आहे.

# पैसे घेऊन प्रिया दत्तने दिली तिकिटे, राहुल गांधींविरोधात कटकारस्थान - काँग्रेस नेत्यांचा आरोप

**मुंबई-** लोकसभा निवडणुकीपासून काँग्रेसला गटबाजीचे लागलेले ग्रहण विधानसभेच्या तोंडावर अधिक गडद होत आहे. अनेक नेत्यांनी पक्ष सोडल्यामुळे गलितगात्र झालेल्या काँग्रेसमधील नेत्यांना मात्र अजुनही अंतर्गत वादातून फुरसत मिळेनासी झाली आहे. 'माजी खासदार प्रिया दत्त यांनी कलिनाची उमेदवारी पैसे घेऊन केली. राहुल गांधी यांच्या विरोधातही पक्षात कट सुरु आहे,'



असा खळबळजनक आरोप पक्षातून होत आहे. काँग्रेसचे नगरसेवक ब्रायन मिरांडा यांनी सोनिया गांधी यांना पत्र लिहून प्रिया दत्तवर गंभीर आरोप केले. 'प्रिया दत्त पुन्हा एकदा कलिना विधानसभेचं तिकीट विकण्यात यशस्वी ठरल्या असून त्यांनीच जॉर्ज अब्राहम यांना उमेदवारी मिळवून दिली. सुनील दत्त यांच्या मृत्यूनंतर या कुटुंबाने सन्मान गमावलाय. त्यांच्या भावाच्या (संजय दत्त) कारनाम्यांची तुम्हाला माहिती असेलच. आजही त्याचे अंडरवर्ल्डसोबत संबंध आहेत. जेव्हा या गोष्टी समोर येतील तेव्हा तुम्हाला आपल्या निर्णयावर पश्चाताप होईल,' असेही ब्रायन मिरांडा यांनी पत्रात नमूद केले. प्रिया दत्त आणि त्यांच्यात झालेल्या संभाषणाची ध्वनीफितही माध्यमांकडे प्रसारित केली. दुसरीकडे काँग्रेसमध्ये नाराज असलेल्या संजय निरुपम यांनी गुरुवारी पक्षाचा प्रचार करणार नसल्याची भूमिका जाहीर केली. 'मुंबईच्या तीन-चार जागा सोडल्या तर काँग्रेसच्या सर्वच उमेदवारांची अनामत रक्कमही जप्त होईल,' असे भाकितही त्यांनी पत्रकार परिषद घेऊन वर्तवले. 'काँग्रेसमध्ये सिस्टिमॅटिक फॉल्ट झाला असून केवळ माझ्याच नव्हे, खुद्द राहुल गांधी यांच्या विरोधातही कट रचला जात आहे. हे सुरळीत न झाल्यास पक्ष बरबाद होईल. मी सुचवलेल्या उमेदवारांशी खरगे यांनी साधी चर्चाही केली नाही. मुस्लिम मतदार काँग्रेसला एकगठ्ठा मतदान करतात. त्यामुळे मुंबईत मुस्लिमांना संधी द्यायला हवी, पण माझे ऐकले नाही,' असेही ते म्हणाले.

# भाजप-शिवसेनेचा हिंदुत्वाचा अजेंडा देशासाठी घातक

**बारामती- विरोधकांचा हिंदुत्वाचा अजेंडा बाजूला सारुन या निवडणुकीत महाआघाडीचे उमेदवार मोठ्या संख्येने निवडून देत पुन्हा एकदा समतेचे कोल्हापूर हा संदेश देशभर दिला जाईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केला. काँग्रेस- राष्ट्रवादी मित्र पक्ष महाआघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ पवार कोल्हापुरात आले होते.**

महाआघाडीच्या जिल्ह्यातील नेत्यांशी संवाद साधून निवडणुकीसंदर्भात कानमंत्र दिला. यावेळी पवार म्हणाले, की भाजप-सेना नेत्यांनी आम्ही हिंदुत्वाच्या मुद्यावर एकत्र येत असल्याचे सांगितले. त्यांनी देशाचा, समाजातील गरीब माणसाच्या विकासाचा मुद्दा मांडला नाही. केवळ हिंदुत्व हा हाच धागा असल्याचे ते सांगतात. वास्तविक देशात राज्यात हिंदू, मुस्लीम, शिख, अशा सर्व जाती धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने नांदण्याचा इतिहास आहे. मात्र केवळ एकाच धर्माचा अजेंडा राबवून विरोधक देशातील समतेचे कार्यक्रम हाणून पाडत आहेत. विरोधकांचा हा विचार सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने देशाला घातक आहे. त्यामुळे सर्व समविचारी पक्षांनी एकत्र येऊन एका विचाराने पुढे जात आहे. सामाजिक अंतर वाढविणाऱ्या प्रवृत्ती थोपविण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. तो यशस्वी करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. कोल्हापूर प्रागतिक



विचाराचा जिल्हा आहे. या नगरीने नेहमी समतेचा आणि पुरोगामी विचार देण्याचे काम केले आहे. या नगरीत मागील निवडणुकीत हिंदुत्वाचा अजेंडा पुढे आल्याने आम्हालाही धक्का बसला. या निवडणुकीत कोल्हापूरकर यामध्ये आता बदल केल्याशिवाय राहणार नाहीत. फुले, शाहू, आंबेडकर यांचा समतेचा विचार पुन्हा एकदा देशभर पोहोचविण्याचे काम कोल्हापुरातून होईल. सर्वांनी एकजुटीने कामाला लागून महाआघाडीचे उमेदवार अधिकाधिक निवडून आणावेत, असे आवाहन त्यांनी केले.

पवार पुढे म्हणाले, कोल्हापुरात भाजप-सेना वाढणे समतेच्या विचारांशी सुसंगत गोष्ट नाही. यंदा काही काही झाले तरी बदल घडवून पूर्वी घडलेली चूक दुरुस्त करुन कोल्हापूर दिशा देणारे शहर आहे. येथे समतेच्या विचारांशी तडजोड करीत नाहीत हे पुन्हा दाखवून देउया.

दरम्यान, जिल्ह्यात महाआघाडीचे आठ उमेदवार विजयी होतील यासाठी कार्यकर्ते जीवाचे रान करतील, तरुणाईमध्ये पवार यांचे आज मोठे आकर्षण आहे. तरुणाईचा पाठिंबा, पवार साहेबांची जिद्द आणि महत्वकांक्षा यामुळे राज्यातील सरकार उलथवून टाकल्याशिवाय जनता राहणार नाही. असा विश्वास आमदार हसन मुश्रीफ यांनी स्वागतपर भाषणात व्यक्त केला.

# ...तर तू तुझा पक्ष काढ: कोण म्हणालं होतं हे नितीन नांदगावकरांना?

**मुंबई-** नुकतंच नितीन नांदगावर यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला जय महाराष्ट्र करत शिवसेनेत प्रवेश केला त्यानंतर त्यांच्यावर अनेकांकडून टीका करण्यात आली. परंतु त्यांनी आपण पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय का घेतला याचं कारणं सांगितलं आहे. 'आपण सुरू केलेल्या जनता दरबारात अनेक ठिकाणाहून लोक त्यांच्या समस्या मांडण्यासाठी येत होते. त्यांचे प्रश्नही त्या माध्यमातून सोडवण्याचा मी प्रयत्न केला. या जनता दरबारामुळे मिळालेली लोकप्रियता काही मनसेच्या नेत्यांना खटकली आणि त्यांच्यामुळे जनता दरबार बंद करावा लागला. तसंच हा जनता दरबार कायमचा बंद करण्यास सांगण्यात आलं. तसंच मनसेच्या काही नेत्यांनी हं हवं असल्यास तू तुझा पक्ष काढ असंही सांगून टाकलं. दरबाराच्या माध्यमातून जनतेची सेवा



करता येत नसल्यानं अखेर मला मोठा निर्णय घ्यावा लागला आणि आपण शिवसेसेनेत प्रवेश केला' असल्याचं नितीन नांदगावकर म्हणाले. त्यांनी फेसबुकवर यासंदर्भातील एक व्हिडीओ शेअर केला आहे.

'मनसे सोडल्यानंतर अनेकांनी मला ट्रोल केलं. परंतु त्यांनी मी मनसे का सोडली हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही. या प्रवासादरम्यान, अनेकदा राज ठाकरे यांची मोलाची साथही लाभली. लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी जनता दरबार सुरू केला. अगदी कमी काळात तो लोकप्रियही झाला. परंतु वाढती लोकप्रियता ही पक्षातील काही बड्या नेत्यांना खटकली. यामुळे अनेक समस्यांचा सामना करावा लागला. परिणामी जनता दरबार बंदही करावा लागला,' असं नांदगावकर म्हणाले.

'आपल्या पक्षातला एखादा कार्यकर्ता मोठा होतो, तेव्हा पक्षाने त्याकडे अभिमानानं पाहिलं पाहिजे. पण याठिकाणी तसं झालं नाही. मी कधी आमदारकी आणि खासदारकीसाठीही इच्छुक नव्हतो. केवळ जनता दरबार सुरू ठेवण्याची विनंती केली होती. पण त्यावेळी काही बड्या नेत्यांतकडून तू तुझा पक्ष काढ असं सांगण्यात आलं,' असंही त्यांनी नमूद केलं. 'ज्यावेळी मी तुरूंगात होतो तेव्हा मनसेचा कोणताही नेता भेटायला किंवा विचारपूस करायला आला नाही. पण जनता दरबार कायमचा बंद करण्यास सांगितला तेव्ही काही निर्णय घेण्याचं ठरवलं. आता शिवसेनेत प्रवेश केला आहे.

# तिकीट कापलेले खडसे-तावडे भाजपचे स्टार प्रचारक

**मुंबई-** विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने त्यांच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये तिकीट न मिळालेल्या एकनाथ खडसे आणि विनोद तावडे हे भाजपचे स्टार प्रचारक आहेत. भाजपने ४० स्टार प्रचारकांच्या यादीची घोषणा केली आहे. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, जे.पी. नड्डा, राजनाथ सिंग, नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या प्रमुख नेत्यांचा समावेश आहे.

राज्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी हे १० सभा तर गृहमंत्री अमित शाह हे २० सभा घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पण या सभांचं वेळापत्रक अजूनही समोर आलेलं नाही. विधानसभा निवडणुकीसाठी भाजपकडून प्रचारासाठी पुन्हा एकदा मोदी कार्डचा वापर होणार आहे. यामध्ये जम्मू काश्मीरमधला अनुच्छेद ३७० रद्द करण्याचा मुद्दा महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. २१ ऑक्टोबरला महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्यामुळे १९ ऑक्टोबरला संध्याकाळी प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. २४ ऑक्टोबरला या निवडणुकीचे निकाल लागणार आहेत.



# भाजपचे पराग शाह सर्वात श्रीमंत उमेदवार; संपत्ती ५०० कोटी

**मुंबई-** राज्याचे माजी गृहनिर्माण मंत्री प्रकाश मेहता यांना डावलून भाजपनं उमेदवारी दिलेले नगरसेवक पराग शाह हे विधानसभा निवडणुकीतील राज्यातील सर्वात श्रीमंत उमेदवार आहेत. पराग शाह यांची एकूण संपत्ती ५०० कोटी असल्याचं समोर आलं आहे.

प्रकाश मेहता यांचं तिकीट कापून भाजपनं पराग शाह यांना घाटकोपर पूर्व मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. उमेदवारी जाहीर होताच शाह यांनी काल अर्ज दाखल केला. निवडणूक अर्जासोबत त्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात आपल्या संपत्तीचं विवरण दिलं आहे. त्यानुसार त्यांची संपत्ती अंदाजे ५०० कोटी इतकी आहे. यात त्यांच्या पत्नीच्या नावावरील संपत्तीचाही समावेश आहे. ५० वर्षीय शाह यांनी व्यवसाय व गुंतवणूक हे आपल्या उत्पन्नाचे स्त्रोत म्हणून दाखवले आहेत. त्यांच्या एकूण संपत्तीमध्ये ७८ कोटींची स्थावर तर, ४२२ कोटींची जंगम मालमत्ता आहे. शाह पती-पत्नीच्या नावावर तब्बल २९९ कोटींचे शेअर्स आहेत. तर, व्यावसायिक, निवासी, कृषी व बिगरकृषी अशा १० स्थावर मालमत्ता आहेत. महाराष्ट्र व गुजरातमध्ये त्यांच्या नावे शेतजमीन आहे. त्यांच्याकडं २ कोटी ६ लाखाचे दागदागिने आहेत. ९ लाखांची स्कोडा कार आणि २ कोटी ४७ लाखांची फेरारी गाडी आहे. शाह हे बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांच्या मालकीच्या दोन कंपन्या आहेत. मुंबईसह गुजरात व चेन्नईमध्ये त्यांचे बांधकाम प्रकल्प सुरू आहेत. २०१७ मध्ये भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवून शाह हे मुंबई महापालिकेत नगरसेवक म्हणून निवडून गेले आहेत. महापालिकेच्या निवडणुकीच्या वेळी त्यांनी ६९० कोटींची संपत्ती जाहीर केली होती.

# आचारसंहिता कालावधीत ४३ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त

**मुंबई - राज्यात विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत निवडणूक यंत्रणा, पोलीस, आयकर विभाग, उत्पादन शुल्क विभाग आदी विभागांनी केलेल्या कारवाईत आतापर्यंत रोख रक्कम, दारू, मादक पदार्थ, सोने-चांदी आदी स्वरूपात ४३ कोटी ८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी दिलीप शिंदे यांनी आज दिली.**

शिंदे यांनी सांगितले, की भरारी पथके (एफएस), स्थिर सर्व्हेक्षण पथके (एसएसटी), पोलीस, आयकर आणि सीमाशुल्क विभागाने केलेल्या कारवाईत आजपर्यंत ९ कोटी ५३ लाख रुपयांची रोकड जप्त रुपयांचा मुद्देमाल जप्त : दिलीप शिंदे

करण्यात आली आहे. भरारी पथके (एफएस), स्थिर सर्व्हेक्षण पथके (एसएसटी), पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत ९ कोटी ७१ लाख रुपये किमतीची ११ लाख ८८ हजार ४०० लिटर दारू जप्त करण्यात आली आहे.

निवडणूक यंत्रणा आणि अंमली पदार्थ विरोधी दलाने केलेल्या कारवाईत आतापर्यंत १५ कोटी ७ लाख रुपयांचे मादक पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. याशिवाय ८ कोटी ७७ लाख रुपयांचे सोने, चांदी, जवाहिर आदी जप्त करण्यात आले आहेत.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)